सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

**क्र. १०]  सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२१ : अग्रहायण ७, शके १९४३  [किंमत ०.०० रु.]**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत**

## भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांजकडून**
**पोटनिवडणुक २०२१ ची अधिसूचना.**

वाचाः- १) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/ मनपा/२०१८/प्र.क्र.४४/का-०५ दि. २८.०९.२०१८.

२) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.रानिआ/ मनपा-२०२१/प्र.क्र.१८/का-५ दिनांक २४.११.२०२१.

३) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.२०२१/नपप्र/आस्था-१/निवडणुकवि/कावि-९९० दि.२४.११.२०२१.

४) या कार्यालयाचे आदेश क्र. नांवाशमनपा/निवडणुक/ ११९९ / २०२१ दि. २५.११.२०२१.

**क्रमांक जा.क्र.नांवाशमनपा/निवडणूक/ १२०१ /२०२१.–** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व सदर अधिनियमाच्या अनुसूची " ड " मधील निवडणूक नियमामधील तरतुदीनूसार मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानरगपालिका प्रभाग क्र.१३-अ च्या पोटनिवडणूक २०२१ करिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम निश्चित करून दिलेला असून, उपरोक्त आदेशातील तरतुदीनूसार **मी,** डॉ. सुनिल लहाने, आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड प्रभाग क्र.१३-अ च्या पोटनिवडणूक २०२१ साठी खालील प्रमाणे निवडणूकीचा कार्यक्रम याद्वारे प्रसिध्द करीत आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | दि. २९/११/२०२१ (सोमवार) सकाळी ११.०० ते दि. ०६/१२/२०२१ (सोमवार) दुपारी २.०० पर्यंत |
| २ | वरील नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी | दि. २९/११/२०२१ (सोमवार) ते दि. ०६/१२/२०२१ (सोमवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत ) (दि. ०५/१२/२०२१ रोजी रविवार असल्याने नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत) |
| ३ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ०७/१२/२०२१ (मंगळवार) (सकाळी ११.०० पासुन) |
| ४ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पुर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९/१२/२०२१ (गुरुवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. १०/१२/२०२१ (शुक्रवार) |
| ७ | अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. १०/१२/२०२१ (शुक्रवार) |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. २१/१२/२०२१ (मंगळवार) (सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत) |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक | दि. २२/१२/२०२१ (बुध्वार) |
| १० | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे. | दि. २८/१२/२०२१ (मंगळवार). |

वरील निवडणूकीचे कार्यक्रम पार पाडणेसाठी व निवडणूक कार्यक्रमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी संदर्भ क्र. १ च्या आदेशातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणूक केलेली असून त्यांचे नांवे स्तंभ क्र.२ मध्ये दिलेली आहेत. तसेच त्यांना नेमून दिलेले प्रभाग स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. त्याशिवाय निवडणूक निर्णय अधिका-यांच्या मदतीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-याची नेमणुक करण्यात आलेली असून त्यांचे नांव स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

| अ. क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमून दिलेले प्रभाग क्रमांक व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिका-यांचे कार्यालयांचे ठिकाण | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री लतीफ पठाण, जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड. | १.श्री.आर.डब्लु. मीटकरी, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड.<br>२.श्री.गुलाम महमंद सादिक, सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर मनपा, नांदेड | १३ - अ अनु.जाती (महिला)<br>चौफाळा / मदीनानगर. | निवडणूक विभाग, श्री.गुरु गोविंदसिघजी स्टेडियम परिसर, नांदेड. | श्री. गुरु गोविंदसिघजी स्टेडियम इमारत, पहिला मजला,पुर्वेकडील हॉल, नांदेड. |

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५-ब मधील तरतुदीनुसार व मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १८/०३/२०२० च्या पत्रान्वये उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केलेले आहे.**

उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे / शपथपत्रे ऑनलाईन (Online) पध्दतीने आयोगाने निश्चित करून दिलेल्या (**http://panchayatelection.maharashtra.gov.in**) या वेबसाईटवर भरून त्याची प्रत स्वाक्षरी करून निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विहीत वेळेत व विहीत पध्दतीने दाखल करावेत.

ठिकाणः- नांदेड
दिनांकः- २९ / ११ /२०२१.

**( डॉ. सुनिल लहाने )**
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.